**सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणा-या कर्मचा-यांची सुधारित वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय क्रमांक : पुनिवे-१००९/ प्र.क्र.७८/सेवा-४ ,
मंत्रालय , मुंबई- ४०००३२ , दिनांक :११ जुलै, २०१२.

संदर्भ: १) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक : पुनिवे-१००९/ प्र.क्र.७८/सेवा-४ , दिनांक.१५ डिसेंबर, २००९.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक : पुनिवे-१००९/ प्र.क्र.७८/सेवा-४ ,दिनांक.१६ ऑगस्ट, २०११
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : पुनिवे-१००९/ प्र.क्र.७८/सेवा-४ ,दिनांक.२१ एप्रिल, २०१२

**शासन निर्णय**

सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणा-या कर्मचा-यांची वेतननिश्चिती करण्याबाबतचे आदेश संदर्भाधिन क्रमांक १ व २ येथे उल्लेखिलेल्या अनुक्रमे दिनांक.१५ डिसेंबर, २००९ व दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयामुळे पुनर्नियुक्त माजी सैनिकांचे अंतिम वेतन संरक्षीत होत नाही, राजादिष्ट अधिका-यांची वेतन निश्चिती नगण्य/कमी होत आहे, काही प्रकरणात वसुली करावी लागत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे हा संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक १६ ऑगस्ट, २०११ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून. प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१ अ) दि.०१.०१.०६ पूर्वी सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन दि.०१.०१.२००६ पूर्वीच ( पाचव्या वेतन आयोगामध्ये) राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची वेतननिश्चिती करताना संबंधित कर्मचा-यास पाचव्या वेतन आयोगात मिळत असलेले वेतन (मुळ वेतन +वैयक्तिक वेतन) x १.८६ (शा.नि. दि.२९.०४.२००९ मधील परिच्छेद क्र.७.४ नुसार येणारी रक्कम १०च्या पटीत) + ज्या पदावर तो नियुक्त झाला आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन एवढे वेतन अनुज्ञेय करावे.

वरिलप्रमाणे वेतननिश्चिती केल्यानंतर संबंधित कर्मचा-यांच्या वेतनवाढी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ च्या नियम १० नुसार विनियमित करण्यात याव्यात.

२ अ) दि.०१.०१.२००६ पूर्वी सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेले माजी सैनिकांची वेतननिश्चिती करताना संबंधित माजी सैनिकास सैनिकी सेवेतून निवृत्त होताना मिळत असलेले मूळ वेतन (गुड सर्व्हिस पे, क्लास पे, रँक पे सह)x १.८६ (शा.नि. दि.२९.०४.२००९ मधील परिच्छेद क्र.७.४ नुसार येणारी रक्कम १०च्या पटीत) + नागरी सेवेत तो ज्या पदावर तो नियुक्त झाला आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन एवढे वेतन अनुज्ञेय करावे. अशा प्रकारे वेतननिश्चिती करताना तो ज्या पदावर नियुक्त झाला आहे, त्या पदासाठी विहीत केलेल्या पे बँडच्या कमाल वेतनापेक्षा सैनिकी सेवेतील अंतिम मुळ वेतन x १.८६ यामुळे येणारी रक्कम जास्त असेल तर त्याला या दोन्हीमधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून द्यावे व नागरी सेवेतील ज्या पदावर तो कार्यरत आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय करावे. जर त्या पदाच्या किमान वेतनापेक्षा सैनिकी सेवेतील अंतिम मुळ वेतन x १.८६ यामुळे येणारी रक्कम कमी येत असेल तर ज्या पदावर त्याची नियुक्ती झाली आहे, त्या पदाच्या किमान वेतनावर त्याची वेतननिश्चीती करावी व त्या पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय करावे.

२ ब) दि.०१.०१.२००६ पूर्वी सैनिकी सेवेतून राजादिष्ट पदावरुन सेवानिवृत्त होऊन दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करावी:

संबंधित राजादिष्ट अधिका-यास सैनिकी सेवेतून निवृत्त होताना मिळत असलेले मूळ वेतन (गुड सर्व्हिस पे/जी.सी.बी पे, क्लास पे, रँक पे सह)x १.८६ (शा.नि. दि.२९.०४.२००९ मधील परिच्छेद क्र.७.४ नुसार येणारी रक्कम १०च्या पटीत) वजा सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तीवेतन (सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तीवेतन वजा दुर्लक्षित रक्कम) + नागरी सेवेत तो ज्या पदावर तो नियुक्त झाला आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन एवढे वेतन अनुज्ञेय करावे. मात्र असे वेतन अनुज्ञेय करत असताना म.ना.से . (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) नुसार पुनर्नियुक्तीचे वेतन + निवृत्तीवेतन यांची बेरीज सैनिकी सेवेतील अंतिम वेतनापेक्षा अधिक असता कामा नये . अन्यथा म्हाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील नियम ८ प्रमाणे या नियमांसोबतच्या जोडपत्र -३ नुसार संबंधित पदास लागू असलेले प्रारंभिक वेतन + त्या पदाचे ग्रेड वेतन एवढे वेतन अनुज्ञेय करावे.

३ (१) दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेले माजी सैनिकांची वेतननिश्चिती सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होताना त्याचे सहाव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेल्या अंतिम मुळ वेतनावरच (मुळ वेतन + गुड सर्व्हिस पे /जी.सी.बी पे,+क्लास पे + एक्स ग्रुप पे, रँक पे +ग्रेड पे) करण्यात यावी. या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी नागरी सेवेत ज्या पदावर नियुक्त झालेला आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन या वेतनातून वजा करण्यात यावे व येणारी रक्कम + तो नागरी सेवेत ज्या पदावर नियुक्त झाला आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन एवढे वेतन अनुज्ञेय करावे.

अशी वेतननिश्चीती करत असताना संबंधित माजी सैनिक नागरी सेवेत ज्या पदावर नियुक्त झाला आहे, त्या पदासाठी विहीत केलेल्या पे बँडच्या कमाल वेतनापेक्षा सैनिकी सेवेतील अंतिम मुळ वेतन जास्त असेल तर त्याला या दोन्हीमधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून द्यावे व नागरी सेवेतील पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय करावे.जर त्या पदाच्या किमान वेतनापेक्षा सैनिकी सेवेतील अंतिम मुळ वेतन कमी असेल तर ज्या पदावर त्याची नियुक्ती झाली आहे, त्या पदाच्या किमान वेतनावर त्याची वेतननिश्चीती करावी. व त्या पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय करावे.

३ (२) दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सैनिकी सेवेतून राजादिष्ट पदावरुन सेवानिवृत्त होऊन दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर राज्याच्या नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करावी:

संबंधित राजादिष्ट अधिका-यास सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होताना त्याचे सहाव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेले अंतिम मुळ वेतन (मुळ वेतन + गुड सर्व्हिस पे +क्लास पे + एक्स ग्रुप पे, रँक पे) वजा सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तीवेतन (सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तीवेतन वजा दुर्लक्षित रक्कम) + नागरी सेवेत तो ज्या पदावर तो नियुक्त झाला आहे, त्या पदाचे ग्रेड वेतन एवढे वेतन अनुज्ञेय करावे. मात्र असे वेतन अनुज्ञेय करत असताना म.ना.से . (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) नुसार पुनर्नियुक्तीचे वेतन + निवृत्तीवेतन यांची बेरीज सैनिकी सेवेतील अंतिम वेतनापेक्षा अधिक असता कामा नये. त्यामुळे सैन्यातील अंतिम वेतन वजा सैनिकी सेवेतील सुधारित निवृत्तीवेतनातून दुर्लक्षित निवृत्तीवेतन वजा करुन येणारी रक्कम वजा नागरी सेवेतील पदाचे ग्रेड वेतन)एवढे वेतन व नागरी सेवेतील पदाचे ग्रेड वेतन अनुज्ञेय करावे.

उपरोक्त २ व ३ या दोनही संवर्गामध्ये दि.२ जुलै ते दि.१ जानेवारी या कालावधीत नियुक्त झालेल्या कर्मचा-यास पुढील १ जुलै रोजी वेतनवाढ अनुज्ञेय राहील. तर दि.२ जानेवारी ते दि. ३० जून या कालावधीत नियुक्त झालेल्या कर्मचा-यास **पुढील वर्षाच्या** १ जुलै रोजी वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

४) उपरोक्त सर्व प्रकरणात जेथे निवृत्तीवेतन दुर्लक्षित करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणात निवृत्तिवेतन हे स्वतंत्रपणे घेण्यात येईल. मात्र सैनिकी सेवेतून निवृत्त झालेल्या राजादिष्ट अधिका-यांच्या प्रकरणी रु.४०००/- एवढे निवृत्तीवेतन दिनांक १ जानेवारी, २००६ पासून दुर्लक्षित करण्यात यावे.

५) सैनिकी सेवेतून निवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणा-या ज्या अधिकारी/कर्मचा-यांना म.ना.से.(नि.वे.) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) व १६२ (बी) नुसार वेतननिश्चिती करावयाची नसेल त्यांच्यासाठी म्हाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम ८ च्या जोडपत्र ३ नुसार प्रारंभीक वेतनावर वेतन

निश्चिती करण्याचा विकल्प देता येईल. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आवश्यक तो विकल्प देण्यात यावा. हे आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखाची राहील.

६) नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणा-या माजी सैनिकांच्या वेतननिश्चितीबाबतच्या तरतूदी म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियमात नमूद असून वेतन आयोगाच्या अनुषंगाने मिळणारे सर्व लाभ या पुनर्नियुक्त माजी सैनिकांना मिळत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य स्थापनेपूर्वीचा मुंबई राज्याचा क्र.१७४ दि.२१.१०.१९५० च्या शासन निर्णयातील तरतूदी दि.१ जानेवारी २००६ पासून रद्द करण्यात येत आहेत. मुंबई राज्याच्या क्र.१७४ दि.२१.१०.१९५० च्या शासन निर्णयाच्या आधारे देण्यात आलेल्या सूचनाही दि.१ जानेवारी २००६ पासून रद्द करण्यात येत आहेत. दि.१.१.२००६ पासून संबंधित अधिका-यास तो प्रत्यक्ष घेत असलेल्या मुळ वेतनावरच सर्व भत्ते अनुज्ञेय राहतील. मात्र दि.१ जानेवारी २००६ पासून संबंधित अधिका-यास कमाल वेतनावर देण्यात आलेल्या भत्यांची वसुली न करता ते सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चीमुळे त्याला देय ठरणा-या थकबाकीतून समायोजित करण्यात यावेत.

७) राज्य शासनाकडून निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन घेणारे जे कर्मचारी राज्य शासनाकडून वेतन घेत आहेत अशा कर्मचाऱ्यांच्या वेतन किंवा निवृत्तीवेतनापैकी कोणत्याही एका रकमेवर महागाई भत्ता देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. मात्र माजी सैनिकांचे निवृत्तीवेतन केंद्र शासनाकडून देण्यात येत असल्यामुळे पुनर्नियुक्त माजी सैनिकांना त्यांच्या निवृत्तीवेतनावर मिळत असलेला महागाई भत्ता दुर्लक्षित करुन नागरी सेवेतील पदाकरिता मिळणाऱ्या वेतनावर महागाई भत्ता अनुज्ञेय राहील.

८) राज्याच्या सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकांची नागरी सेवेतील वेतननिश्चिती करताना मिलीटरी पे/मिलीटरी सर्व्हिस पे विचारात घेण्यात येऊ नयेत.

९) संदर्भाधिन क्र.२ येथील दि.१६.०८.२०११ च्या शासन निर्णयामुळे ज्या प्रकरणात वसूली करावी लागत आहे त्या वसुलीस स्थगिती देण्याचे आदेश संदर्भाधिन क्र.३ येथील दि.२१.०४.२०१२ च्या परिपत्रकन्वये अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि वसुलीस स्थगिती देण्याचे आदेश निर्गमित करण्यापूर्वी ज्या प्रकरणात वसुली करण्यात आली आहे, ती वसुलीची रक्कम सुधारित वेतननिश्चितीनंतर संबंधितांना अदा करण्यात यावी.

१०) जे माजी सैनिक दि.१.११.२००५ पूर्वीच नागरी सेवेत नियुक्त झाले आहेत, त्यांच्या नागरी सेवेतील सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. वेपूर १२०९/प्र.क्र.६९/सेवा -९, दि. २९ एप्रिल,२००९ मधील नियम १५ नुसार करण्यात यावी. तर जे माजी सैनिक दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नागरी सेवेत नियुक्त झाले आहेत, त्यांच्या नागरी सेवेतील सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही शासन निर्णय, क्रमांक : अंनियो १०१०/प्र.क्र.६७/सेवा- ४ दिनांक १४ डिसेंबर,२०१० नुसार करण्यात यावी.

१०) वेतन निश्चिती संदर्भात म.ना.से.(नि.वे.) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) व १६२ (बी) मधील तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदींच्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आल्या आहेत असे समजण्यात यावे.

११) संबंधित माजी सैनिक नागरी सेवेत ज्या कार्यालयात नियुक्त झाले आहेत, त्या कार्यालय प्रमुखाने उपरोक्त कार्यपध्दतीप्रमाणे वेतन निश्चिती करावी व वेतननिश्चिती पडताळून पाहण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वेतन पडताळणी पथकाकडून वेतननिश्चितीची पडताळणी करावी.

१२) सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन म.ना.से.(नि.वे.) नियम १९८२ लागू असलेल्या मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे तसेच जिल्हा परिषदा येथे पुनर्नियुक्त होणा-या माजी सैनिकांची वेतननिश्चिती प्रस्तुत सूचनांनुसार करण्यात यावी.

१३) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१२०७१११४१९५८०७०० असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

शुभांगी शेठ

शासनाच्या उप सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
*प्रबंधक,, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२. (१० प्रती)च
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प' खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
मंत्रालयातील सर्व विभाग,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती), संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१० प्रती),
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा रायगड (१० प्रती),
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १,योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २० (५ प्रती)
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४ ( ५ प्रती)
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी , मुंबई १३ ( ५ प्रती )
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती )
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१ ( ५ प्रती )
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

6th pay-re-employment